# कार्यालय

## ग्राम पंचायत बाबदेव

## पंचायत समिती मौदा जिल्हा परिषद नागपूर

### ई-निविदा सुचना क्रमांक 1 – 2025-2026

### वार्षिक ई निवीदा

सरपंच ग्रामपंचायत बाबदेव ता. मौजा जि. नागपुर तर्फे ग्रामपंचायत बाबदेव अंतर्गत सन २०२६–२७ या वर्षात सामान्य निधी, १५ वा वित्त आयोग, दलीत वस्ती नरेगा व इतर विविध शासकिय योजनेअंतर्गत करावयाच्या विकास कामाकरीता लागणारे बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरीता जिल्हा परिषद वेबसाईटवर www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | तपशील | दरपत्रक विक्रीचा दिनांक | दरपत्रक स्वीकृतीचा दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | सरपंच ग्रामपंचायत बाबदेव ता. मौजा जि. नागपुर तर्फे ग्रामपंचायत बाबदेव अंतर्गत सन २०२६–२७ या वर्षात सामान्य निधी, १५ वा वित्त आयोग, दलीत वस्ती नरेगा व इतर विविध शासकिय योजनेअंतर्गत करावयाच्या विकास कामाकरीता लागणारे बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरीता | दि. / /2026 सकाळी 10.00 वाजता पासून | दि. / /2026 दुपारी 03.00 वा. पर्यत | दि. / /2026 दुपारी 03.00 वा. नंतर |

निवेदेतील अटी व शर्ती जि. प. नागपूर च्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

निविदा सादर करण्यासाठी डिजीटल सही अनिवार्य आहे.

सौ. स्नेहल अ. [illegible]कडे
सरपंच
ग्रामपंचायत बाबदेव
सरपंच
ग्राम पंचायत, बाबदेव

सचिव
कु. [illegible]
ग्रामपंचायत बाबदेव
ग्रामपंचायत अधिकारी
गटग्रामपंचायत बाबदेव
जि.प.नागपूर

Scanned with OKEN Scanner

# कार्यालय

## ग्राम पंचायत बाबदेव
## पंचायत समिती मौदा जिल्हा परिषद नागपूर

ई - निविदा सुचना क्रमांक 1 - 2026-2027

यादवारे सर्व अधिकृत साहित्य पुरवठादारास सूचित करण्यात येते की, ग्रामपंचायत सरपंच ग्रामपंचायत बाबदेव ता. मौजा जि. नागपुर तर्फे ग्रामपंचायत बाबदेव अंतर्गत सन २०२६–२७ या वर्षात सामान्य निधी, १५ वा वित्त आयोग, दलीत वस्ती नरेगा व इतर विविध शासकिय योजनेअंतर्गत करावयाच्या विकास कामाकरीता लागणारे बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरीता आवश्यकते नुसार पुरवठा करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक पुरवठादारांनी आपले दर सोबतच्या दरपत्रकामध्ये ग्राम पंचायत बाबदेव जिल्हा परिषद नागपूर च्या वेबसाईट सादर कराव्या. उशिरा आलेल्या निविदेच्या विचार करण्यात येणार नाही.

# अटी व शर्ती

१)सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदा द्वारा ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदा, नोटीस, प्रसिद्धी, सुचना, शुद्धिपत्रके इत्यादीची माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.**

i) पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र (फोटो), जी.एस.टी. प्रमाणपत्र, दुकानाचे बिल व प्राप्ती कर ३ वर्ष भरलेले असावे पॅन कार्ड स्कॅन कॉपी अपलोड (Upload) करावी लागेल.

ii) निविदा प्रमाणपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.

iii) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणताही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

iv) शासनाचा दरसूची (C.S.R.) च्या दरापेक्षा जास्त दर असल्यास ई-निविदा रद्द करण्यात येईल.

१) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कार्यालयात उघडण्यात येईल.

२) मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी ग्राम पंचायतच्या नावे येथे देय असलेल्या धनाकर्षाच्या स्वरुपात राष्ट्रीय बँकेचा स्वीकारल्या जाईल.

Scanned with OKEN Scanner

३) निविदा संदर्भात कोणत्याही मार्गदर्शक सुचना शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

४) सदर कामाच्या तीन योग्य निविदा प्राप्त झाल्याशिवाय निविदा उघडण्यात येणार नाही. मात्र तिसऱ्यांदा एकच निविदा प्राप्त झाल्यास त्या निविदा धारकास निविदा देण्यात येईल किंवा पूर्ण ई-निविदा रद्द करुन त्यात फेरबदल करण्याचा पूर्ण अधिकार ग्रामपंचायत स्वतः कडे राखून ठेवत आहे, याची नोंद घ्यावी.

५) ई-निविदा उघडल्यापासून ३ महिने अथवा काम पूर्ण होई पर्यत ग्राह्य राहतील.

६) पुरवठाधारकातर्फे कोणत्याही अटी व शर्ती घालून सादर केलेल्या ई-निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

७) निविदा मंजून झाल्यास रु. १००/- च्या स्टँप पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

८) ई-निविदा सोबत सत्यप्रती फक्त राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात.

९) ई-निविदा सोबत (ITR) आयकर रिटर्न जोडावे.

१०) साहित्याचे मूल्य हे रॉयल्टी शुक्लासह आणि जी.एस.टी सह असावे. आणि साहित्याचे पेमेंट करते वेळी रॉयल्टी भरल्याचा पावत्या सादर करने आवश्यक राहील. अन्यथा साहित्याचे पेमेंट हे रॉयल्टी कपात करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी

११) निविदा फॉर्म किंमत 1,०००/- रु. चा DD सामान्य फंड ग्रामपंचायत बाबदेव चा नावे देवून ग्रामपंचायतला जमा करावेव त्याबद्दल सामान्य पावतीघेवून सामान्य पावती व DD स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करावा.

१२) UPLOAD केलेला DD निविदा उघडण्याचा दिनांकाचा १ दिवसाआधी दि.   / 05/2026 5 वा. पर्यंत ग्रा. प. कार्यालयात जमा करावी. DD विहित वेळेस ग्रा. प. कार्यालयात जमा न केल्यास त्यांची निविदा अपात्र करण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

१३) साहित्याची रक्कम मूल्यांकनानुसार अनुदान प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१४) बिल जि.एस.टी. पेडेट असने आवश्यक आहे. (जि.एस.टी. प्रमाणपत्र सोबत जोडावे. अन्यथा उक्त निविदा रद्द करण्यात येईल.)

१५) मंजूर निविदाधारकास साहित्याचा पुरवठा निविदा ओपन झाल्यानंतर पुरवठा आदेश दिल्यापासून ७ दिवसाचा आत करावे लागेल अन्यथा दुस-या क्रमांकाचा निविदाधारकाकडून साहित्याचा पुरवठा करण्यात येईल.

१६) सदर ई-निविदेत L1 पुरवठा धारकाने साहित्य पुरवठा न केल्यास L2 कडून आणि L2 ने पुरवठा न केल्यास L3 कडून साहित्य पुरवठा करुन घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१७) पुरवठाधारकास रॉयल्टी, जि.एस.टी., अनामत, सेस, व ईतर कपाती शासनाच्या नियमानुसार बंधनकारक आहे.

१८) निविदा धारकांनी निवेदेतील साहित्याचे दर पूर्ण, तसेच प्रचलित बाजार भावानुसार भरावे अत्यंत कमी अथवा सी. एस आर दरापेक्षा जास्त दराच्या असलेल्या निवदा रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.प. ला राहील याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

निविदा स्वीकृतीचे बंधन निविदा मंजुर करण्याचावर नाही. **कोणतेही कारण न दर्शवीता एक किवा संपूर्ण निविदा** निविदा नाकारण्याचा अगर स्वीकारण्याचा किंवा **रद्द करण्याचा अधिकार** सरपंच ग्रामपंचायत बाबदेव यांनी राखुन ठेवलेला आहे. **याबद्दल** कोणत्याही व्यक्तिस, संस्थेस, व कंत्राटदारास स्पटीकरण मागता येणार नाही. वा **कुठेही तक्रार करता येणार नाही.**

२०) पुरवठा धारकाचे कागद पत्रे चुकीचे आढळ्यास निविदा रद्द करण्यात येईल.

२१) निविदा मध्ये दिलेल्या दरामध्ये साहित्य पुरवठा करण्यात यावे कोणत्याही परिस्थितीत साहित्याच्या दरात वाढ होणार नाही.

२२) ग्रामपंचायत ने दिलेल्या मुदतीत साहित्य पुरवठा न केल्यास सदर निविदा धारकाच्या निविदा रद्द करण्यात येईल याबाबत निविदा धारकाचा कोणताही मुजर वा आक्षेप चालणार नाही.

२३) साहित्य चांगल्या प्रतीचे व उच्च दर्जाचे असावे व प्रमान बद्ध पुरवठा करणे आवश्यक राहील साहित्य नित्कृष्ट दर्जाच्या आढळल्यास त्या निविदा रद्द करण्यात येईल.

२४) कुठल्याही कारणास्तव निविदा रद्द केल्यास निविदा फी परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

२५) निविदा ऑनलाइन प्रकाशित करताना किव्हा उघडताना काही चूक झाल्यास ग्रामपंचायत चा निर्णय अंतिम राहील. कोणताही निविदाधारक आक्षेप घेणार नाही किव्हा त्याचा आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

सौ. स्नेहल अ. वरकडे
सरपंच
सरपंच
ग्रामपंचायत, बाबदेव
ग्राम पंचायत, बाबदेव

कु. स्मिता देवके
सचिव
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत बाबदेव
गटग्रामपंचायत बाबदेव
जि.प.नागपूर

Signature Not Verified
Digitally signed by Snehal Anil Warkade
Date: 2026.05.19 09:54:36 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner